मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गातील
अधिकाऱ्याची बदली करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांक: कअब-१०२६/प्र.क्र.१४/प्रशा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- २० एप्रिल, २०२६

**शासन आदेश**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४) व ४ (५) अनुसार खाली नमूद केलेल्या मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकाऱ्याची प्रशासकीय कारणास्तव आंतरविभागीय बदली करण्यात येत असून, त्याच्या नावासमोरील स्तंभ-५ मध्ये दर्शविलेल्या विभागात त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | श्री./ श्रीमती | कक्ष अधिकाऱ्याचे नांव | सध्याचा विभाग | बदलीनंतर पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | श्री | अनुप प्रकाश कुडव | अल्पसंख्याक विकास विभाग | **पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग** |

२. **श्री.कुडव यांना दिनांक २०.०४.२०२६ (म.नं.) पासून रकाना क्र.४ येथे नमूद विभागातून एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे.**

३. सदर आदेश हेच कार्यमुक्ततेचे आदेश असून संबंधित विभागाने नव्याने आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.

४. बदली झालेल्या अधिकाऱ्यांने त्यांची बदली रद्द करण्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणल्यास संबंधितांची कृती गैरवर्तणूक समजण्यात येईल.

५. साप्रवि, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.४५/१८(र.वका.), दिनांक २५.०८.२०२२ मध्ये नमूद केल्यानुसार, संबंधित कक्ष अधिकाऱ्याने कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

६. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने सदर कक्ष अधिकारी विभागात रुजू झाल्याबाबतची माहिती **सा.प्र.वि./(प्रशा-२)** यांना सादर करावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२०१६०७३३०६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

GAJANAN SAHADEO PARAB

Digitally signed by GAJANAN SAHADEO PARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, 2.5.4.20=23BC53B7F4F1CA24AD7FDD55B639979816E6E784D75D5396D0F50367308ECC8B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6E3168FC30A0E07A9B8D13F2A24C658F97BA49C1AB3A023B1606696C22202DDD, cn=GAJANAN SAHADEO PARAB
Date: 2026.04.20 16:09:01 +05'30'

**( ग.स. परब )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्री.अनुप प्रकाश कुडव, कक्ष अधिकारी, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**....(संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)**

**प्रत,**

१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग व पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३) सह/उप सचिव (आस्थापना), अल्पसंख्याक विकास विभाग व पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, ठाकरसी हाऊस, बॅलार्ड पिअर, सुरजी वल्लभदास रोड, मुंबई-४०० ००१
५) आहरण व संवितरण अधिकारी, संबंधित मंत्रालयीन विभाग (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)
६) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
७) निवड नस्ती-प्रशा/२